# प्रकरण - ३

# 'जिप्सी' मधील प्रेम कविता

- प्रास्ताविक
- विशुध्द भावकविता
- निसर्गप्रतिमातून प्रीतीचे दर्शन
- विरह व्याकुळता
- हळवी पण स्वाभिमानी प्रेयसी
- प्रेमात सत्व जपण्याची इच्छा
- मुक्त जीवनाची प्रेयसीची आवड
- प्रेमातील एकरूपता
- सारांश

## प्रकरण ३

# 'जिप्सी' मधील प्रेम कविता

## प्रास्ताविक

प्रेम ही मानवी मनावर अधिपत्य गाजविणारी एक श्रेष्ठ भावना आहे. त्यामुळे प्रत्येक कवी प्रीतीत रंगलेला दिसतो. अगदी संतापासून आजच्या काळातील नवतरुणापर्यंत सर्वांनीच प्रेमभावनेला शब्दरुप देऊन प्रेमकविता लिहली आहे.

मराठीच्या कवितेच्या आदिपर्वातील, ज्ञानेश्वर आणि उत्तरकालीन संतांची कविवता प्रामुख्याने अध्यात्मिक कविता आहे. तथापि संतांनी ईश्वर विषयक प्रेम अति उत्कट स्वरुपात उच्चतम पातळीवरुन व्यक्त केले आहे. उदा. ज्ञानेश्वरांच्या विराण्या त्या नंतरच्या शाहीरी काळात लावणी, पोवाडे या काव्यातून ही प्रेम भावना वेगळयाप्रकारे व्यक्त केली गेली. अधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुतांनी एका रम्य निरोगी, इहवादी प्रेमाचे मनोज्ञ दर्शन घडविले. कवी गोविंदाग्रज तर प्रणय पंढरीचे वारकरी म्हणून गौरविले गेलेत. माधव ज्युलियनांच्या प्रेमकवितेने प्रगल्भ समंजसपणा प्रकट केला. भारतीय प्रेमदृष्टीचे भारदस्त प्रतिष्ठीत दर्शन बोरकरांच्या प्रेम कवितेत दिसते. प्रेमकवितेची परंपरा अखंडीतपणे चालू आहे.

पाडगांवकरांची प्रेमकविता आपले विशेष वळण घेऊन अभिव्यक्त होते. पाडगावकरांचा प्रेमानुभव वेगळया रूपात जाणवतो त्यांची प्रेमकविता ही विशुध्द भावकविता आहे. विशुध्द भावकवितेसंदर्भात "जिप्सी" च्या प्रस्तावनेत प्रा.वा.ल.कुलकर्णी म्हणतात की, "सकाळी उठताच अंगणातील फुलझाडावर अर्धवट उमललेले किंवा संपूर्ण उमलून वाऱ्यावर डुलणारे फूल दिसावे, त्या फुलाच्या रूपाने प्रकट होणाऱ्या सौंदर्याचा अवतार हा जसा अनपेक्षित परंतु अपरिहार्य असतो, त्याच्या दर्शनाने चित्तवृत्ती ज्याप्रमाणे एकदम पुलकित होतात अगदी तशाच प्रकारचा अनुभव एखादया विशुध्द भावकवितेच्या सानिध्यात येतो."[१]

## विशुध्द भावकविता

विशुध्द भावकविता म्हणजे उत्कट भावनांचा आविष्कार. कवीच्या भावृत्तीची स्पंदने शब्दातुन व्यक्त होताना अनुभुतीचे दर्शन घडत असते. कविचे संवेदनशील भावविश्व रसिक

वाचकाच्या काळजाला जाऊन भिडते कारण कविला आलेली अनुभूती अत्यंत तीव्र असते. कवीच्या भाववृत्तीचे ताण वाचकाच्या अंत:करणाला जाऊन भिडण्यातच भावकवितेचे यश असते. श्रेष्ठ प्रतिभावंत असल्याने पाडगावकरांच्या प्रेमकवितेत असे सामर्थ्य आहे.

मन व्यापून टाकणाऱ्या या भावामुळे व्यक्तीच्या ठिकाणी निर्माण होणारा जोश, अबोध हुरहुर, मुग्ध आणि विमुक्त असा सुखद अनुभव, ऐंद्रिय शारिरी व इतर भावानुभव असे भावसौंदर्य ही कविता व्यक्त करते. वेगवेगळ्या भाववृत्ती (Moods) व्यक्त करताना पाडगावकर नेमक्या निसर्गप्रतिमांचा वापर करतात. कदाचित त्या भावानुभवाचे सौंदर्य टिपताना पाडगांवकरांच्या नजरेपुढे काही निसर्गदृश्ये तरळत असावीत. हेच पहा ना -

'सांगितलेस गुपित
पहाटेच्या दंवापरी
हळु तृणाच्या कानात
कळीपरी नकळत
पानाआड दडूनच
फुललीस अवचित'[२]

हळुवार ह्दयाचा प्रियकर आपल्या प्रेयसीला म्हणतो, की विजेप्रमाणे चमकून तू मन जिंकले नाहीस किंवा भरतीच्या लाटांप्रमाणे प्रीतीच्या मत्त वेगात कधी बुडविले नाहीस. कधी तुझ्या बोलण्यात पौर्णिमेच्या चांदण्याची बरसात दिसली नाही. तुझे उमलणे कसे? तर पहाटेच्या दंवाने आपले गुपित तृणाच्या कानांत सांगावे तसे अथवा कळीने जसे पानाआड दडूनच फुलावे. तशी तू अवचित आणि हळुवारपणे फुललीस.

गाढ एकांतात. बहारलेली तिची मूर्ती तिची निराळीस तऱ्हा सांगून जाते - तिच्यामध्ये दिसलेल्या वेगळेपणाची साक्ष देताना प्रियकर म्हणतो.

'आज तुझ्या लोचनांत
मला दिसले आकाश
गूढ निरोप घेऊन
आज आले तुझे श्वास'[३]

आज तिच्या लोचनात त्याला तिचे मन दिसत आहे. कोणता तरी गूढ निरोप घेऊन तिचे श्वास आले आहेत. शब्दांची सीमा ओलांडली जाऊन नकळत नि:शब्दांची पहाट उमलली आहे. दंवात भिजलेल्या चांदण्यांची लकेरच तिच्या ओठांवर विलसत आहे. आज तिचा एकांत

जणू फलाच्या भाराने जड झाला आहे. त्यामुळे तिच्या रुपातून अरुपाचा भास त्याला होत आहे. त्यामुळे प्रकाशाला पहाटे आधीच जाग आली आहे असे कविला वाटते.

पाडगांवकरांच्या कवितेतील प्रियकर प्रेयसीमधील असणारे प्रेमाचेनाते, त्यांच्या जीवनातील आनंदाचे, साफल्याचे, हुरहुरीचे, उदासिनतेचे, फुलण्याचे, मिटण्याचे, समीप येण्याचे, दुरावण्याचे क्षण नाजुकपणे प्रतिमांकित झालेले दिसतात. प्रेमभावनेला त्यांनी हळुवार, तरल, नाजुक बनविले आहे. 'प्रेम' ही करण्याची-भोगण्याची गोष्ट नसून तो एक संपन्न संवेदनांचा अनुभव आहे ही जाणीव पाडगांवकरांची कविता वाचताना होते. त्यामुळे वासनेलासुध्दा वेगळा अर्थ प्राप्त होतो. असे कवी सांगतो.

'सुंदर आहे माझी वासना
सुंदर जशी आषाढघनांची उन्मत्त गर्जना
जिच्यात लपली नव्या सृजनाची अद्‌भूत प्रेरणा !'[४]

खऱ्या अर्थाने सुखाची निर्मिती व्हायची असेल तर नुसत्या सौंदर्यावर भागणार नाही. या सौंदर्याच्या जोडीला वत्सलता, मायेची पखरण, श्रम-प्रतिष्ठा, शांतता, चिरजागृती, करुणा, मृत्युंजयता, अमृतमयता, मांगल्य या सर्वांची आवश्यकता कवीला वाटते. त्यातूनच कवी उद्याचे दिव्य स्वप्न पहातात.

हे दिव्य स्वप्न पहात असताना वासनेलासुध्दा सुंदरता लाभते. लौकिकदृष्ट्या वासनेचा अर्थ पाप हा असेल, असे म्हटले जाते की ईश्वर प्राप्तीसाठी वासनेचा त्यागच करावा लागतो. पाडगांवकर वासनेकडे अलौकिक दृष्टीने पाहतात. या वासनेत निसर्गाची सुंदरता त्यांना अभिप्रेत आहे. आषाढ घनाची उन्मत गर्जना, तलम आकाश, उडते पक्षी, चांदण्यावरील छायांची नक्षी व निसर्ग युगुलांचे अपूर्व मीलन पाहून कवी तृप्त होतो. बेफाम नदीचे मत्त समुद्राला गाढ आलिंगन, रातराणीने वाऱ्याला दिलेले मादक चुंबन हे अनोखे क्षण कवीच्या डोळ्यात रुतुन बसतात. या वासनेतून धीवरकन्या सत्यवतीने पराशराला ओढून घेतले. कवी म्हणतात वासनेला मिठी न मारणाऱ्या दुर्बलांना हे सामर्थ्य कोठून लाभणार? पराशर एक सामर्थ्याचा प्रतीक मानून पाडगांवकर वासनेला गौरवितात. त्यांच्या प्रेमकथेची नोंद करतात.

जग या वासनेतच जगते. निसर्ग या वासनेतूनच अंकुरतो-फुलतो-फळतो. या वासनेच्या स्पर्शानेच मातीत हिरव्या प्राणाचा संचार होतो. ही वासना म्हणजे हिरवे चैतन्य.

सृजनाची अद्‌भूत प्रेरणा म्हणजे वासना. नवनिर्मितीचा, सृजनशीलतेचा उद्‌घोषच पाडगांवकर या वासनाप्रेमातून करतात. खरा आनंद नवनिर्मितीत, सृजनशीलतेत आहे. वासनेला डोळे मिचकावणे म्हणजे भेकडपणा, दुर्बलपणा होय. या वासनेचे स्वागत पराशरासारख्या सामर्थ्यवान ऋषीच पुण्याचे गाठोडे पाठीवर घेऊन करु शकतो असे पाडगांवकर म्हणतात. यातून पाडगांवकरांची विशिष्ठ वृत्तीच स्पष्ट होते. हीच वृत्ती त्यांच्या 'हात हवे मज' या कवितेतूनही दिसून येते.

'हात हवे मज नाजूक सुंदर
जुईपुष्पांपरी ज्यांचे मार्दव
श्रावणातल्या उन्हापरी अन् ज्यांचे लाघव!
स्पर्श जयांचा स्पर्शमण्यापरि
अवखळ चंचल जे लाटांपरि
दडले ज्यातुन
प्रमत्त यौवन
पुनवेच्या उत्फुल्ल रात्रिचे रजत निमंत्रण'[५]

जुईपुष्पांसारखे ज्यांचे मार्दव नाजुक सुंदर आहे. श्रावणातल्या उन्हासारखी ज्यांची लाघवता आहे. लाटांसारखे जे अवखळ-चंचल आहेत. ज्यांच्यामध्ये प्रमत्त यौवन दडले आहे. अशा हातांची म्हणजेच अशा प्रेयसीरुपी साथीची कवीला अपेक्षा आहे. कारण त्यातून निर्मल मार्दवाचे नाते निर्माण होते. हे मार्दव तिने प्रियकराला कसे द्यावे? तर -

'तू उधळावे
पाकळ्यातले निर्मळ मार्दव
सदाफुलीपरि
सदा तुझे फुलणारे लाघव'[६]

तिने सदाफुलीसारखे आपले फुलणारे निर्मळ मार्दव सदा उधळीत रहावे असे आवाहन कवी करतो. मध्यरात्रीच्या आकाशासारखी तिची गूढता कवीला भावते. मात्र त्या गुढतेतूनच तिची खरी ओळख होऊ लागते. कवीला जाणीव आहे की काही वेळा वाटसुध्दा अंधारात बुडून जाते किंवा ओठावरचे गीतसुध्दा अवचित स्तब्ध होते. तथापि उद्याची चिंता किंवा खंत करत बसणे योग्य नाही. तिने सदैव शुभ्र प्रकाश देणाऱ्या चांदणीसारखे असावे साथीदाराला उत्साही करावे अशी कवीची अपेक्षा आहे.

निर्मल मार्दवाचे नाते आहे ते मराठी कवितेतील रोमँटिक प्रवृत्तीशी. मर्ढेकरांनी, करंदीकरांनी रोमँटिक वृत्तीशी संबंधीत असूनही वास्तवाबद्दलच्या वाढत्या भानाने या प्रवृत्तीला कालांतराने छेद दिला पण पाडगांवकर मुलत:च सौंदर्यवादी भावकवी असल्याने त्यांची प्रेमजाणीव ही रोमँटिकच आहे. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात 'विदुषक', 'सलाम' च्या निमित्ताने व भ्रष्ट सामाजिकतेने वास्तवसन्मुख झालेली त्यांची दृष्टी सामाजिक, राजकीय क्षेत्रापुरतीच मर्यादित राहिलेली दिसून येते. त्यामुळे त्यांच्या प्रेम कवितेतील भावसौंदर्य त्यांच्या कोमलतेला, सजिवतेला धक्का न लावता व्यक्त होते.

## निसर्गप्रतिमांतून प्रीतीचे दर्शन

पाडगांवकरांच्या प्रेमकवितेमधून प्रेम भावाच्या विविध छटांचे आणि वृत्तींचे हळुवार दर्शन घडते. प्रेम-भाव हा एक समर्थ भाव आहे. सर्व मन व्यापुन टाकण्याची शक्ती या भावाच्या ठिकाणी आहे. त्यामुळे त्याची अबोध, मुग्ध अशी तरलता व विमुक्ततेतील अनुभव, त्याची शारीर बाजू व तिच्याशी सलग्न असणारे वेगवेगळे अनुभव, यातून प्रकट होणाऱ्या विविध भावछटातील सौंदर्य त्यांच्या प्रेमकवितेतून व्यक्त होते. महत्वाचे म्हणजे हे भावसौंदर्य निसर्गप्रतिमेतून व्यक्त होते आणि हे निसर्गप्रतिमांचे आवरण इतके पारदर्शक आहे की कवितेचे मुळचे नितळ रुप झाकले जात नाही. म्हणूनच काही वेळा नुसत्या गंधातूनच गुढ उकलण्याची क्रिया होते.

'ते किती लपविले तरिही
मज नकळत कळते कळते
पाकळ्यात दडले तरिही
गंधातुन गुढ उकलते'[७]

तिने न बोलतासुध्दा फक्त तिच्या हालचालीतून काही गोष्टी समजतात. मग ह्दयाच्या मौनातून झालेली पहाट, गगन धरेचे मिलन, यातून तिच्या सौंदर्याचे गुढ उकलू लागते. या सौंदर्याच्या ध्यासातच त्याचे जीवित एकवटलेले असते. त्यामुळे तिचे सौंदर्य पुन:पुन्हा नवीन-नवीन रुपातून दिसावे ही त्याची इच्छा आहे.

'ये नवीन होऊन पुन्हा तू, ये नवीन होऊन
मृदुल उन्हाचे भिजवित रेशिम
ये कधि रिमझिम श्रावणसरिसम

अर्ध-उमलल्या फुलांभोवती हांसत फेर धरुन
ये नवीन होऊन पुन्हा तू, ये नवीन होऊन'[८]

मृदुल उन्हाला भिजवित रिमझिमणाऱ्या श्रावणसरीसांरखे तिने यावे अशी प्रियकराची इच्छा आहे. कधी फुटणाऱ्या लाटांसारखे, कधी हळव्या-हिरव्या वाटांसारखे, तर कधी डोक्यावर ढगांचे काठोकाठ कलश भरुन चांदण्यात तिने यावे असे वाटते.

तिने कधी बीजातील उमलता प्राण होऊन, तर कधी मृदगंधातून नवसृजनाचे आश्वासन मिरवून तिने यावे. आम्रवनातून ललकारत येणाऱ्या कोकीळेसारखे कधी तिने यावे, तर कधी वसंत ऋतुत उमलणाऱ्या फुलांसारखे, समुद्राच्या फेसाळणाऱ्या लाटांसारखे तिने यावे अशी त्याची इच्छा आहे.

यंत्राप्रमाणे रुक्ष झालेल्या या जीवनात प्रेयसीने मंत्रासारखे यावे ज्यामुळे रोजचे यंत्रासारखे झालेले हे जीवन तिच्या येण्यामुळे अखंड नूतन होईल, चैतन्यमय होईल म्हणून कवी तिला पुन्हःपुन्हा 'ये नवीन होऊन' अशी आळवणी करतो.

प्रेयसीसुध्दा त्याला भेटण्यास आतूर झाली आहे. मग भल्या पहाटेच त्याच्या भेटीसाठी ती येत आहे हे कवीला समजते म्हणून तो तिला आवाहन करतो.

'जर पहाटेच येणार तरी
ये धुके होऊनी गहन निळे
रे, नकळत तव करुणेपरि जे
दंव होऊनि हरित तृणी निथळे'[९]

कवी म्हणतात की ती जर पहाटेच येणार असेल तर धुके होऊन किंवा हिरव्या तृणावरुन अलगद निथळणाऱ्या दवांसारखे तिने यावे. इतकेच नाही तर निसर्गाच्या अनेकविध प्रतिमांतून तिने प्रकटावे असे कवीला वाटते. म्हणून कवी म्हणतात की जर रात्री येणार असशील तर पाणांची थरथर होऊन प्राणांची ओढ लागल्यासारखी ये, फुलातून तुझे रुप दिसणार असेल तर तृणपुष्प होऊन ये, ध्यानाद्वारे ताऱ्यांना-वाऱ्याला मुग्ध करीत रंगाद्वारे डोळ्यांना सुखवीत, ज्योतिर्मय होऊन तिने यावे, तसेच फुलाफळातून, ऋतुऋतुतून वाऱ्याबरोबर वाहत, जलधारांतून भिजत येण्याचे आवाहन कवी करतात. मग दोघांचे मीलनही निसर्गानुभवातून व्यक्त होते. जसे-

'जमीन काळी
मातला अंधार
घट्ट कवळी'[१०]

पाडगांवकरांची कविता दृश्यरुप होतानाच मनरुप होत असते हे तिचे वेगळेपण इथे दिसून येते. अंधारात भिजलेली रात्र तिच्या कापऱ्या तंद्रीत भिजलेली पाने, उडणारा काजवा एकाकीपणे झुरत मालवणारा बुडालेला. या अंधार सावल्या जणू अभिसारासाठी आसावलेल्या प्रणयिनीच होत. रात्रीच्या भिजेलपणात असणाऱ्या तरल संवेदना व्यक्त करताना-एकांताची तीव्र कळ इथे व्यक्त झाली आहे. मात्र या तीव्र वेदनेला मीलनाचा सुखद आनंद लाभला आहे.

मातलेला अंधार काळ्या जमीनीला घट्ट कवळतो आहे. शारीरी प्रेमाची संवेदना निसर्गदृश्यातून हळुवारपणे व्यक्त केली आहे. ही तऱ्हाच वेगळी आहे.

प्रियेबरोबर घालवलेल्या मधूर क्षणांची सतत आठवण राहावी असे कवीला वाटते आणि असे क्षण स्मरत असताना कवीला त्या क्षणाशी एकरुप झालेला निसर्गही आठवतो.

'हळुहळु तरुंच्या गुढतरल सावल्या
पंखापरि पसरत संथ गहन जाहल्या
दोघांच्या छाया... एकरुप आपुल्या!
तुज आठवते का?'[११]

'दोघांच्या आपुल्या एकरुप छाया' या प्रतिमेतील मनोमिलनाची सूचक जाणीव हळूवारपणे दाखविली आहे. कवी प्रेयसीला म्हणतात की, मोकळ्या वाटेवरुन हातात-हात गुंफून आपण खूप भटकलो, कधी नुसते स्तब्धच झऱ्याच्या काठी पाण्याकडे पाहत बसलो, कसलेसे पान डोळ्यांच्या पापणीवरुन फिरवताना हृदयापर्यंत थरथरत शहारलेले शरीर, तर कधी कातरवेळी अगदी मुकपणे एकमेकांना बिलगुन बसलेले तुला आठवते का? अशा आठवणी सांगतानाच तर पुढे पंखासारख्या पसरत संथ गहन झालेल्या दोघांच्या एकरुप झालेल्या छाया 'माझेपण' हरवून जातात इतक्या त्या एकरुप होतात. या एकरुपतेचे वर्णन करताना कवी म्हणतात.

'गहन तुझ्या डोळ्यात खोल बुडताना
नकळत मज माझेपण परके झाले
शब्दहि होते ओठावरती आले
परंतु अवचित त्यांचे...थेंब दवाचे झाले'[१२]



... LIBRARY
... UNIVERSITY, KOLHAPUR

कवी आपल्या प्रेयसीच्या डोळ्यात इतका बुडून जातो, इतका एकरुप होतो की माझेपण सुध्दा हरवुन बसतो. तिच्यावरचे असणारे प्रेम व्यक्त करण्यासाठी त्याच्या ओठावर कितीतरी वेळा शब्द आले. पण त्या शब्दांचे केव्हा थेंबामध्ये रुपांतर झाले हे कवीलाच समजले नाही. अशावेळी मनाचे गूज विस्मृतीच्या अतिगहन वनात उडून गेल्याचा भास कवीला होतो. मनाच्या जाणिवेची स्तब्धता वर्णन करताना कवी म्हणतात की, वारा बोलत नव्हता, पाने हालत नव्हती, पाण्यावर पसरलेली स्तब्धता आर्त पापणीसारखी वाटत होती आणि त्याचक्षणी पापणीआड दडलेल्या तुझ्या डोळ्यात अवचित गूढ गवसले.

शिशिरामधल्या गुढ पहाटे ज्याप्रमाणे समुद्र धुक्यात पार बुडून जावा तसेच स्वत:च्याच गुढतेत बुडलेले ते क्षण होते याची प्रांजळ कबुली कवी देतो.

प्रेमातील या निसर्गानुभवाला कधीकधी कौटुंबिक वातावरणाचे वत्सल रुप प्राप्त होते.

'कोवळ्या पाण्याचा लख्ख आरसा
त्यात डोकावे शुभ्र ढगाचा गुलजार ससा'
किंवा
'शालीन कौलांची कुलीन घरे
आतिथ्यशील कुणाची वाट पाहती बरे'[१३]

'निवांत' कवितेतील-कोवळ्या पाण्याचा लख्ख आरसा, ढगांचा गुलजार ससा, सळसळणारा पळस, शालीन कौलांची घरे एखाद्या छोट्या कुटूंबातील रसिक प्रणयोत्सुक व धार्मिक अशा वातावरणाचे भावरुप आपल्यापुढे साकार करतात.

पळसाची सळसळ जणू एखाद्या भक्ताची मनाची तळमळच आहे; त्याची भक्तीच आहे. त्या भक्ताचे देवालय हे अथांग पसरलेले आभाळ आहे. या नभाचा कळस न्याहाळताना त्याचे सळसळणे जणू भक्तीचा गंधच आहे. तर ढगाच्या गुलजार सशाचे लख्ख नितळ पाणी आरशात डोकावणे जणू कुटूंबातील छोट्याशा बाळाचे बाळपणच. इथे पळसाचे सळसळणे जणू घरातील वृध्द व्यक्तीची हरीभक्ती. कुटूंबातील भावनांचे विविध तरंग निसर्गप्रतिमांतून सूचित होत रहातात. झडून गेलेली लवचिक सर आणि भिजलेल्या पानात वाऱ्याची शीळ ओली होण्यालाही वेगळाच अर्थ प्राप्त होतो. प्रेमिकांच्या मनाचे गलबललेपण नकळतपणे इथे जाणवते. अशीच प्रणयाची नवी चाहूल पाऊलवाटेला लाभली आहे. कारण तिने लाल वळसा घेऊन पुढे

**जाण्याची घाई केली आहे. असे कवी म्हणतो. या लाडिक घाईत धोक्याचा कंदिल ओलांडून तिने पुढे धाव घेतली आहे. तिही लारिकपणे.**

या विविध निसर्गप्रतिमांतून कुटूंबाचे विविध पदर उकलताना अतिथ्यपणा आवश्यकच आहे. 'शालीन कौले' ही प्रतिमा आतिथ्यशील पतिव्रतांचे रुप डोळ्यापुढे आणतात. त्यामुळे सारीच घरे कुलीन होतात. घरामध्येही समृध्दता, तृप्तता, शांतता पाहून घराचा मालक सुखाने न्हावून जावा, प्रसन्न व्हावा हे स्वाभाविकच आहे. त्यामुळे ढगांचा गुलजार ससा-बाळसुख, सळसळता पळस-भक्तीसुख, वाऱ्याची ओली शीळ-प्रणयसुख असे सुखानुभव पाहुन घरातील मालकाने तृप्ततेने हसावे हे स्वाभाविकच. या सर्व प्रतिमांना अर्थपुर्ण आकार देणारी सामर्थ्यवान प्रतिमा कवितेत शेवटी येते व 'निवांत' हा अर्थदृष्ट्या समृध्द होतो. हसरे आकाश फेनिलकांत आहे. शुभ्र ढगांनी त्याचे फेनिलपण व्यक्त करताना जणू घरातील संपन्न व्यक्तित्वाने मुक्तपणे हसावे. या सर्वातून कवीच्या भाववृत्तीचे विविध पदर इथे व्यक्त झालेले दिसून येतात.

## विरह व्याकुळता

पाडगांवकरांच्या काही प्रेमकवितेतून विरहाची व्याकुळता दिसून येते. काही ठिकाणी हळवा तरल प्रेमभाव दिसतो. तसेच एकनिष्ठ प्रीतीची प्रचिती येते. अशाच विरही भावनेचे वर्णन 'शिशिरामधल्या उत्तररात्री' मध्ये दिसून येते.

'शिशिरामधली रात्र
उदास आर्त विचित्र
सुनेपणावर ढाळीत बसे दवाची कोवळी फुले!
शिशिरामधल्या उत्तररात्री आकाश मनात झुरे
निष्पर्ण तरुंच्या भोवती वारा उदास होऊन फिरे!''[१४]

विरही अवस्थेचे वर्णन करताना कवी म्हणतात शिशिरातल्या उत्तररात्रीचे आकाश मनात झुरत बसल्यासारखे दिसते. वारा उदास होऊन फिरत आहे. आजूबाजूला दाटून राहिलेले अबोल धुके. मधूनच अंधाराच्या कुशीत शिरणारा विचित्र पक्षी हे सर्व तिचे एकाकीपण अधिकच गडद करतात. जणू तिच्या मीलनाची तृषा संपूर्ण आकाशभर भरुन राहिली आहे.

तिचे एकाकी खिन्न मन शिशिरामधल्या उत्तररात्री झुरणारे आकाश, उदास वारा, रितेपणावर दवाची कोवळी फुले ढाळणे अशा शब्द चित्रातून दिसून येते.

**प्रेमामध्ये प्रेयसीची अवस्था जशी व्याकूळ होते. तशीच अवस्था प्रियकराचीही झालेली दिसून येते. अशावेळी तिचा ध्यास लागल्यामुळे गंधातुन गूढ, उकलण्याची क्रिया** नकळतपणे घडते. ऱ्हदयीच्या मौनात नकळत पहाट होते.

'दूरांत पलिकडे जेव्हा
हळु गगन धरेला मिळते
ते अद्‌भुत मज कळल्याची
वेदनाच नुसती उरते'[१५]

ह्दयाच्या मौनातून झालेली पहाट, गगनधरेचे मीलन यातून तिच्या सौंदर्याचे गूढ उकलते. या सौंदर्याच्या ध्यासातच त्याचे जीवित एकवटलेले असते. मग त्या ध्यासापोटी कधी तगमगणे, तर कधी आनंदून जाणे, तर कधी वेदनेतच सुख भोगणे क्रमप्राप्तच असते. त्यातूनच आकाश धरतीला मिळाल्याची साक्ष मनाला पटते परंतु ते चिरंतन प्राप्त होत नाही. याची वेदना कवीला व्याकुळ करते.

प्रेयसीच्या भेटीची तृप्तता मिळत नाही. हे दुःख, ही वेदना प्रियकराला व्याकुळ करते. कारण तिच्या असण्यातच आपल्या भावजीवनाची सुंदरता आहे. याची पुरेपुर जाणीव त्याला आहे. त्यामुळे तिच्या नसण्यामुळे लागलेली हुरहुर तो लपवू शकत नाही. म्हणून तो आपल्या प्रेयसीला म्हणतो -

'तू असतिस तर झाले असते
गडे उन्हाचे गोड चांदणे
मोहरले असते मौनातुन
एक दिवाणे नवथर गाणे'[१६]

वरील ओळीतील 'गडे' या शब्दाने तिच्यावरच्या प्रीतीची निकटता अधिक जाणवते. तर 'उन्हाचे चांदणे' ही प्रतिमा अत्यंत बोलकी, अनुरुप आणि सुंदर आहे. कारण 'उन्ह' आता आहे आणि ती असली तरी ते असणार आहे. परंतु तिच्या सहवासात त्यातील दाहकता नष्ट होऊन ते अधिक आल्हाददायक हवेहवेसे वाटण्यातच जीवनाची परिपूर्णता आहे. त्या उन्हाचे चांदणे झाले असते असा आत्मविश्वास त्याला वाटण्यातच तिच्या अस्तित्वाचे यश आहे. तिच्या सहवासातून त्याला नवथर गाणे गाण्याची प्रेरणा सुध्दा मिळणार आहे. तिचे जवळ नसणे, तिचा विरह हेच त्याचे दुःख आहे.

**एकीकडे 'माझे पंख मागू नको' किंवा 'जवळ-जवळ ये पण सीमेचे भान असू दे' असे सांगणाऱ्या पाडगांवकरांना तिच्या नसण्यात या जीवनाची सुंदरताच आपण हरवून बसलो आहोत या जाणिवेची तीव्र कळ अस्वस्थ करते, मग तिची ही अवस्था यापासून कोणती वेगळी असेल?** उलट ती तर अबोलच आहे. त्यामुळे तिच्या ह्दयातील वेदना बाहेर पडायलाही मार्ग नाही.

'ही व्यथा मनीची मौनातच साकळ्ली
का असेल तुजला अश्रूतुन आकळ्ली?
मी नाहि बोलले...नाहि झाला धीर...
वेदना उरीची उरीच रे कळवळ्ली'[१७]

ही प्रेयसी आगपाखड करणारी परंतु त्याच्यावर अपरंपार प्रेम करणारी आहे. म्हणून तर ती खोट्या अभिमानाने आपण त्याच्याबरोबर उगीचच भांडल्याचे मान्य करते. मात्र मनातील ही व्यथा त्याला सांगू शकत नाही. कारण तेवढा तिला धीरच झाला नाही. असे असले तरी माझेपण विसरुन ती त्याच्यासाठी सतत तळमळ्त रहाते.

काहीवेळा ही मनाची विरही अवस्था स्तब्ध उभ्या राहिलेल्या निसर्गातील काही घटनांसारखी होते. आकाशात दिसत असलेला एखादाच ढग, संथ पाणी, न डोलणारे माड, पंख मिटून बसलेला पारवा या घटना एकाकीपणात अधिकच भर टाकतात. अशा एकाकी अवस्थेमध्येच अचानक कसली तरी हुरहुर लावणारी आठवण होते आणि काजळाच्या कोषातून तेजाचे पाखरु उडू लागते. अशा वेळी ह्दयाच्या खोल कप्प्यात गाढ निजलेली तार जागी होते व आठवणींची विझलेली आग पेट घेऊ लागते. त्यामुळे मनाची अवस्था कशी होते तर -

'अशा वेळी जागी होते
तार गाढ निजलेली
अशा वेळी पेट घेते
आणि आग विझलेली'[१८]

तिच्या आठवणींच्या ज्वाळा एकाकी दुपार जाळु लागतात. पण आपले हे दु:ख तिला सांगायचे तरी कसे? हा प्रश्न कवीला पडतो. त्यामुळे कवी म्हणतात.

'अलीकडे लपवितो
तुझ्यापासून मी माझी व्यथा
सांगायचे टाळतो मी
आसवात भिजलेली कथा'[१९]

आता-आता मी तुझ्यापासून माझी व्यथा लपवितो आहे. आसवात भिजलेली कथा तुला सांगायचे टाळतो आहे. मात्र माझ्या मनाच्या फुलांचा गंध तुझ्या भोवती सतत घोटाळत असतो. तू अवतीभोवती पाहिलेस तर त्या फुलांच्या निर्माल्याची रास पडलेली दिसून येईल. इथे 'इथे मनची फुले व निर्माल्य' या प्रतिमांनी कवीने आपल्या हळूवार प्रेमभावनांचे निर्माल्य कसे झाले हे सांगितले आहे. 'निर्माल्य' या शब्दातून कवीची प्रियेबाबतची असलेली आदराची भावना प्रतीत झाली आहे. पण बहुदा आपले दु:खी जीवन तिला समजावे किंवा तिने आपल्या ह्या अवस्थेची आपुलकीने चौकशी करावी इतकी आपली प्रीती विकसीत झाली नसावी अशी समजूत मनाशीच घालून घेत त्यासाठी थोडी प्रतिक्षा करण्याची तयारीही कवीची आहे. मात्र ती प्रतिक्षा हुरहुर लावणारी आहे. कारण भोवतालच्या वातावरणातही कुंद रितेपण आले आहे. चमकणारा एखादा क्षणही लगेच अंधारात बुडून जातो. चिमणीच्या भिजलेल्या पंखासारखी जाणिव आतमध्ये फडफडत, थरथरत आहे. अशा वेळी -

'अधिकच खुपते
स्थिरावलेले शब्द जिच्यावर
ती चिरपरिचित कक्षा!
मनात उरते
काळोखातच हुरहुरणारी
धुसर आर्त प्रतीक्षा'[२०]

ती चिरपरिचित नजर अधिकच खुपू लागते आणि मनात उरते काळोखात-हुरहुरणारी आर्त प्रतिक्षा! ही प्रतिक्षा आर्तच म्हणावी लागेल कारण सावलीची 'काळी कड' आणि 'प्रकाश' यांचे मीलन कसे शक्य आहे? मग थिजल्या ओठांची अवस्था कशी होते तर -

'काळी कड सावलीची
प्रकाशाला शिवू बघे
आणि थिजल्या ओठांनी
पुन्हा काळोखात रिघे!'[२१]

ह्दयाच्या खोल कप्पात ठेवलेल्या जाणीवा अवचित शोधण्याचा मोह होतो. पण खिन्नतेचे अंधारावर आलेले काळे हिरवे शेवाळ किंवा हुरहुर ढाळत बसलेल्या वडाच्या फांद्या हे एकाकीपण अधिकच गडद करतात. मग हळुहळु आपले मीलन होणे शक्य नाही याची जाणीव होवू लागते. विरहाची वेदना गडद होते. व्याकूळ करते.

'जाणवते तुला...मला
भासात या सत्य नवे
खिडकीच्या भिजलेल्या
काचेतून जसे दिवे'[२२]

कवी म्हणतात की भिजलेल्या खिडकीच्या काचेतून दिवे धूसर दिसावेत तसे आपले मीलन धूसर झाले आहे. आपल्या भावना जणू रफू केल्यासारख्या झाल्या आहेत. त्या दीर्घ काळ आपण मिरवू शकणार नाही. प्रीतीच्या ओल्या आठवणी खूप वेळ आधार देणार नाहीत. आपले मीलन म्हणजे फक्त सावल्यांचा व्यापार उरला आहे. कारण तुझ्या-माझ्यामध्ये एक नवा धुक्याचा पुल उभा आहे. त्यावर धुसर अनोळखी चाहूल आहे. मात्र मीलनाचे सुख विरले असले तरी धुक्याचा हा दुवा आपल्या दोघांच्या मिलनाची साक्ष देणारा असेल, अशी कवीची भावना आहे. तिच्याविना जीवन जगण्याची मनाची तयारी करुन तसे जीवन जगत असताना अचानक समोर उभी राहिलेली प्रेयसी पाहून कवीच्या विस्मृतीत गेलेल्या आठवणी जाग्या होतात.

'विस्मरणाचे दान तुझे ते सरले आज
आठवणींचा घेऊनि आलिस सुंदर साज
तसले काही तेव्हांचे ते
मनी न माझ्या भलतेसलते
उरी न कटुता शल्यहि काही नुरले आज
आठवणींचा घेऊनि आलिस सुंदर साज'[२३]

कवी म्हणतात की तू आज आठवणींचा सुंदर साज घेऊन आली आहेस. मात्र आज तिच्याबद्दल काही भलते-सलते भाव नाहीत किंवा कटूतेचे शल्यही मनात उरलेले नाही. मध्यंतरीच्या काळात तुझे माझ्याशी बोलणे किंवा हसणेही झाले नाही आणि आज अचानक जणू काही घडलेच नव्हते. या अविर्भावात तू आठवणींचा साज घेऊन समोर उभी आहेस म्हणून कवी गोंधळून जातात. पुढे ते म्हणतात, आज आपली ओळख असूनही तू अनोळखी झालीस, एकमेकांना भेटण्यासाठी उत्सुक असूनही अनुत्सुक झालीस, पण तुझे ते लज्जीत हास्य माझ्यापासून कसे लपवशील? आज तिच्या शब्दांवर मौनाची जाळी जरी पसरली असली तरी तिच्या शिशिराच्या विरक्तीत ऋतूराज दडल्याचे कळल्याचा आनंद कवीला आहे.

इथे शारीरिक मीलनापेक्षा तिच्या मनातील भाव कवीला महत्वाचे वाटतात. पण 'तृप्त गडे मी व्यथा कोठूनी' या शब्दांतून तिच्याविना जीवनाचे अधुरेपणच व्यक्त होते.

## हळवी पण स्वाभिमानी प्रेयसी

हट्टी परंतु त्याच्यावर जीव ओवाळून टाकणारी प्रेमिका पाडगावकरांच्या प्रेमकवितेत उभी राहते. मात्र ती स्वाभिमानी आहे. ही प्रेयसी आगपाखड करणारी परंतु त्याच्यावर अपरंपार प्रेम करणारी आहे. त्याच्या भेटीची हूरहूर मनात दडपून वेदना उरी जाणवते.

कधी कधी तिला त्याचे प्रेम रानटी वाटते. त्या रात्री तो आंधळी वासना घेऊन तिच्याजवळ आला. तशी ती त्याच्यावर आगपाखड करते. निर्दय होऊन त्याला दूर लोटते. तो त्यामुळे लज्जित झाला. मात्र पहाटेला जेव्हा तिला जाग आली तेव्हा तिला दिसले की त्याने स्वत:चे पांघरुण तिच्या थरथरणाऱ्या देहावर घालुन पाय पोटाशी दुमडून घेऊन तो निजलेला आहे. तेंव्हा तिला भरुन येते.

'त्या क्षणि मी त्याला
निर्दय होऊनि दूर लोटिले
.....................
अवचित जेव्हा जाग पहाटे आली
अन् गार चावरी झुळुक वायुची
येउनि भिडली!
मी शहारले, थरथरले,
मी सहज पाहिले....
अन् पुन्हा पाहिले आश्चर्याने...
पांघरुण त्याचे होते माझ्या अंगावरती!
दुमडून पाय पोटाशी
तो तसाच होता निद्रित...स्वप्नांकित!'[२४]

उठून बाहेर ओटीवर येऊन तिने काय पाहिले तर अगदी लाख-लाख फुलांनी मोगरा फुलला होता. जणू गंधित नक्षत्रांनी अंधार सुगंधित होऊन तिच्या मनासारखा थरथरत-शहारत होता. त्याच्या प्रेमाची साक्ष तिला पटली होती. तिच्या मनाचे अडसर गळून पडले होते आणि त्यामुळे अंधारही सुगंधित झाला होता.

पाडगांवकरांच्या कवितेतील प्रेयसी ही स्वाभिमानी आहे. आपल्या सौंदर्यात त्याला गुंतवून ठेवणारी ती नाही किंवा स्वप्नविलासात दंगही झालेली नाही. जे काय आहे ते सर्वांसमक्ष आहे. त्याचे मन ती जिंकते पण त्या जिंकण्यात त्याच्या म्हणण्यानुसार दाहकता, धुंदी नाही तिची

तऱ्हाच वेगळी आहे. देवापुढे जळणाऱ्या नंदादीपासारखी ती आहे. खळखळुन हसणे, भुलवणे तिच्या ठिकाणी आहे. परंतु तिच्या अबोलपणातच त्याच्या चैतन्याचा झरा उभा आहे. या अमृत झऱ्यानेच एक नवी पहाट कवीला मिळाली आहे.

'अलगुज' मधील प्रेयसी सुध्दा अशीच आहे. दैनंदिन जीवनातील पाश सोडून मुक्त जीवनाचा आस्वाद घ्यावा अशी तिचीही वृत्ती आहे. ती त्याला सांगते -

'दूर कुठे तरि वाटे जावे
आणि जगावे माणुस म्हणुनी
जिथे जाणवे वसंत...वर्षा
जिथे शृंखला नसती चरणी!'[२५]

लैकिकात माणूस म्हणून जगणे कठीण आहे. निसर्गाच्या सोहळ्यातच भावजीवनाला अर्थ आहे. अशी तिची श्रध्दा आहे; इतकी ती कोमल ह्दयाची आहे. ती आडपडदा ठेवून वागणारी नाही. प्रामाणिकपणे व सरळपणे जीवन जगणारी आहे. त्यामुळे तिचा साधा, सरळ प्रश्नही कित्येकवेळा कवीला निरुत्तर करतो. ती त्याला विचारते -

'विसरलात ना माझी ओळख?
कशास मग ही फसवाफसवी?
सांगा माझे नाव बरे मग
सांगा ना! का लपवाछपवी'?[२६]

ध्यानीमनी नसताना ती अचानक कवीसमोर उभी रहाते अचानक समोर आल्येल्या तिच्याबद्दल त्याची स्मृती आता धुसर झाली आहे. मात्र कवीने ओळखल्याचा बहाणा करुन केलेले खोटे हास्य तिने ओळखले आणि धीटपणे त्याला आपले नांव विचाराले तेंव्हा कवीचा चेहरा अगदी पहाण्यासारखा झाला. नंतर मोकळेपणाने त्यांनी गप्पा केल्या. उगीच हसले, फुलाप्रमणे फुलले, जुन्या आठवणीनां उजाळा दिल्या हसत खळखळत रस्त्यावरुन मोकळेपणाने बोलत दोघे चालत राहिले. निरोप घेताना तिच्या डोळयात आनंदाची लकेर थरथरलेली पाहून तो भतलातच खूश झाला. तंद्रीतच घरी आला. आपले अलगूज शोधून त्यावर आनंदाने सूर छेडले.

काही वेळा प्रियकराने अभिसार होऊन पहाटे किरणांच्या तारा छेडीत भोवती स्वरांची उधळण करीत यावे अशी तिची इच्छा आहे. तिला त्याच्यामध्ये एकरुप व्हायचे आहे, तरीही ती म्हणते.

'जरि तुझिया सामर्थ्याने
ढळतील दिशाही दाही
मी फूल तृणातिल इवले,
उमलणार तरिही नाही'[२७]

तिला स्वत्व जपणे महत्वाचे वाटते. ती म्हणते, तुझ्या शक्तीने दिपून सारे तुला मुजरा करतील पण त्यांच्या ओठांवर हसरे गाणे कसे उमलणार? मला हळुवारपणे सोबत करणारे दवबिंदु, तृणाचे पाते जिंकील, स्वत:स विसरुन वारा माझ्याशी रेशमी नाते जोडेल श्रावणातल्या जलधारा मला कुरवाळतील, सळसळून भिजलेली पाने मला सजल इशारा करतील. असे असताना तुझ्या सामर्थ्याने मी कसे मला विसरावे? म्हणून प्रियकराने आपले मोठेपण विसरुन धुक्यातून मला शोधत दवबिंदू होऊन यावे असे मनोगत ती व्यक्त करते. कारण शेवटी तिची इच्छा एकरुप होण्याची आहे. म्हणून ती म्हणते -

'तू तूलाच विसरुन यावे
मी तुझ्यात मज विसरावे
तू हसत मला फुलवावे
मी नकळत आणि फुलावे'[२८]

अशी ही हळवी पण स्वाभिमानी प्रेयसी आत्यंतिक एकरुपता मान्य करणारी आहे. तरीही तिला वर्चस्व, जबरदस्ती अमान्य आहे. त्यांने सहज हसत फुलवावे आणि आपणही सहजच नकळत फुलावे.

## प्रेमात स्वत्व जपण्याची इच्छा

पाडगांवकरांची प्रेमकविता प्रेमबंधनामध्ये जगताना काहीवेळा अलौकिकतेकडे झुकत असलेली दिसून येते. त्यामुळे तिला वास्तवाचे भान न रहाता जे अनाकलनीय आहे. त्याची ओढ आहे. चराचरातील हिरव्या चैतन्याची ओढ पाडगांवकरांना आहे. त्यासाठीच प्रियसीने काय हवे ते मागावे पण माझे पंख मागू नयेत, अशी प्रियकराची आर्त विनंती तिला आहे. निर्झराच्या काठी असणारी धुंद रेशमी झुळझुळ, झरणाऱ्या श्रावणधारा, उमटणारे इंद्रधनुष्य, निशिगंधाची मत्त मिठी हे सारे काही तिचेच आहे. तिच्या पापण्यात त्याने बांधलेले स्वप्न दडलेले आहे. अशा क्षणाला ती त्याचे स्वप्न आहे तरीही तो तिला निक्षून सांगतो -

'दान स्वप्नाचे देऊन
जाग माझी मागू नको

माग हवे ते गडे तू
माझे पंख मागू नको'[२९]

स्वप्नांचे हे दान स्विकारताना त्याला डोळसपण हवे आहे. जाग हवी आहे. या जागेपणीच तो तेजाचा यात्रिक होणार आहे. या प्रकाशयात्रेसाठी गती, सुगंध, गाणे, विकास, जागृती यातून त्याच्या अस्तित्वाच्या भावखुणा उमलणार आहेत. दूर कुठेतरी जाऊन माणूस म्हणून जगताना निसर्गसुखाचा आनंद सोहळा पहायला मिळावा. वास्तवाचे बंध गळून पडावेत अशी इच्छा या प्रियकराची आहे. तो प्रेमाच्या मधुपाशात स्वत:ला गुंतवूनही अलिप्त राहू इच्छितो. फुलातील परागकण वेचणाऱ्या फुलपाखरासारखी वृत्ती पाडगावकरांची आहे. आकाशाच्या अथांगतेचा वेध घ्यावा, चैतन्यावरुन जीव ओवाळून टाकावा ही कवीची भाववृत्ती असल्यामुळे घरातच काय पण प्रेमाच्या पाशात गुंतून राहाणे कवीला मानवत नाही म्हणून प्रणयाच्या भावविश्वातही ते तटस्थ राहातात. याचा अर्थ त्यांचे प्रेयसीवर प्रेम नाही असा नाही. तर त्यांचे प्रियेवर अथांग प्रेम आहे. परंतु या प्रेमात आपण अविरतपणे डुंबत राहिलो तर आपले अलौकिक भावजीवन संपून जाईल याची भीती कवीला आहे आणि अशा वेळेस आत्मचिंतनात हरवलेल्या प्रियकराला प्रश्न पडतो -

'गुंफियले कर हे झाले पहा साखळ्या
मीलन कसले? जे न बघू दे दिशा मोकळ्या
खोल उरी कुणि तडफडले, पण जाणवले नच ते आक्रंदन
इतुके आलो जवळ जवळ की जवळपणाचे झाले बंधन'[३०]

अशा शारीरिक मीलनापेक्षा अपार्थिव मीलनाची आस या प्रियकराला आहे. इथेच पाडगांवकरांच्या भावजीवनाची आत्मिक खुण प्रतिबिंबीत होते. हा प्रियकर तिची समजूत घालताना स्वत:च्या स्वतंत्र अस्तित्वाला अधिक महत्व देतो.

'निकट असुनिही श्वासापुरते दूर असावे
जवळपणातही पंखांना आकाश दिसावे
जवळ-जवळ ये, पण सीमेचे भान असू दे
रात्र असो, पण पहाटही वेगळी दिसू दे
स्वरजुळणीतुनि एक गीत -
तरी हवेच अंतर सात सुरांतून
इतुके आलो जवळ जवळ की जवळपणाचे झाले बंधन'[३१]

**लौकिक भावजीवनात संपूर्णपणे न हरवता आपल्या कलात्मक भावजीवनाची सतत आठवण या कविमनाला आहे. तिचा निकट सहवास हवा आहे. पण त्याला सीमा हवी, रात्र हवी** पण पहाटही वेगळी हवी. या वेगळेपणातच रात्र व दिवसाचे सौंदर्य सामावले आहे. कारण वीणेच्या तारांमधुन मधुर गीत निघायचे असेल तर त्या तारांमध्ये अंतर हे असावेच लागते. म्हणून ज्यामुळे जवळपणाचे बंधन होईल इतके जवळ न येणेच चांगले असे कवीला वाटते. यातून प्रियकराची प्रेमात स्वत्व जपण्याची आवडच दिसून येते.

## मुक्त जीवनाची प्रेयसीची आवड

पाडगावकरांच्या कवितेतील 'स्त्रीरुप' केवळ शारीरिक सौंदर्यात न्हात नाही. ते उथळ नाही किंवा सौंदर्याची ऐट मिरवणारे नाही. ते प्रसंगी दाहक तर दुसऱ्या बाजूला हळुवार, स्वाभिमानी, शांत, मुग्ध आहे. परंतु काही वेळेला ही प्रेयसी मुक्त जीवनाची आवड असणारी अशीही भेटते. अशी ही प्रेयसी स्वत:चा उल्लेख 'चंचल' असा करते. भरतीच्या लाटांसारखी स्वैर जीवन उधळणारी आहे.

'नजराणे घेऊन ऋतूंचे
हृदयातील गंधित हेतूंचे
आकाशाची प्रिया कधी मी होऊनि लाजत सजल्ये
मी चंचल होऊनि आल्ये'[३२]

तिच्या गात्रा-गात्रांमध्ये जणू इंद्रधनुष्ये फुललेली आहेत. क्षितिजाचा वेध घेणारे तिचे कटाक्ष आहेत. तिने विरघळलेले नवथर उन्मत्त चंद्रकिरण प्राशन केले आहेत. आषाढ आकाशातील गर्जत येणाऱ्या ढगाप्रमाणे तिचे आगमन कवीला भावते. धूसर अंधारात वेड्यासारखी ती फिरते तर शुक्राच्या प्रतिबिंबासारखे जणू पाण्याचे स्वप्न बनून ती रात्री येते. कधी श्रावणाच्या ओठांमध्ये लपून रिमझिमणाऱ्या लाटांद्वारे तिचे आगमण होते. तर कधी आकाशाची प्रिया होऊन लाजत तिचे आगमन होते. एकंदरीत जन्ममृत्युचे कुंपण ओलांडून येणारी ही प्रेयसी कवीला चिरकालची प्रवासिनीच वाटते.

## प्रेमातील एकरुपता

कधी-कधी पाडगांवकरांच्या कवितेतील प्रेयसी स्वत:चे देहभान विसरुन त्याच्यामध्ये एकरुप झालेली दिसून येते. तिचे ते अवखळ एकरुपपण सांगताना कवी म्हणतात, वर्गात

तासाच्यावेळी तिला त्याच्याशिवाय दुसरे काही दिसायचेच नाही, मग प्राध्यापकांच्या शिकवण्याकडे तरी कसे लक्ष असणार! "मी इतकी भित्री असताना असे कसे घडले?" याचे तिचे तिलाच आश्चर्य वाटते.

सहलीच्यावेळी नकळत सगळ्यांच्या पाठीमागे राहिलेली, चालताना चुकून झालेला स्पर्श आणि त्याच क्षणी मनात मोहरलेला गुलमोहर, ही वाट कधीच संपू नये अशी झालेली मनाची अवस्था, संमेलनामध्ये कृष्णवसन नेसून आल्यावर त्याचे स्तिमित होऊन पाहणे, त्या प्रसंगी तिचे गडबडणे, गोंधळणे, शब्दावाचून सारे बोलुन जाणे, या सर्वांचे संदर्भ तिला आठवतात - आश्चर्यात बुडवितात.

'त्या संध्याकाळी सागरतीरावरती
रंगाची होती मैफल क्षितिजावरती!
पाण्यात तरंगत होते केशर भिजले
वर फेनफुलांचे शुभ्र गुच्छ झुललेले!
... ... ... ... ... ... ...
का स्वप्नच होते जग भवतीचे सारे?
का स्वप्नच होत्या लाटा... तारे... वारे?
मी इतुकी भित्री... असे कसे मग घडले?
मज नव्हते ठाऊक; अजून नाही कळले!'[३३]

त्या संध्याकाळी सागरतीरावर त्याच्या हातात हात गुंफून फिरत असताना हळूहळू अंधार पडू लागला आणि त्या हातांची मिठी कधी तिच्याभोवती पडली हे तिलाही समजले नाही, इतकी ती त्याच्यामध्ये एकरुप होऊन गेली आहे. तिला सर्वच गोष्टी स्वप्नवत वाटतात. शिवाय आपण इतक्या भित्र्या असतांना असे कसे आपल्या हातून घडले कळत नाही असे म्हणते. उत्कट, उस्फूर्त प्रेम माणसाला आपोआप धीट बनविते. आत्मविश्वास देते हेचे कवीना इथे सुचवायचे आहे.

## सारांश

मंगेश पाडगांवकरांची 'जिप्सी' मधील प्रेमकविता ही विशुध्द भावकविता आहे. सौंदर्यलक्षी मनाच्या पाडगांवकरांची ही कविता वाचकाच्या चित्तवृत्ती पुलकीत करते. रसिकाच्या काळजाला भिडते. त्यातील उत्कट भाव, संवेदनाशील मन रसिकाचे मन व्यापून टाकून त्याला

एक वेगळाच आनंद देते. पाडगांवकरांनी अत्यंत संवेदनशील मनाने प्रियकर प्रेयसींच्या मनाच्या विविध भाववृत्ती (Moods) हळुवारपणे अभिव्यक्त केल्या आहेत. त्यासाठी अत्यंत समर्पक निसर्ग प्रतिमा वापरल्या आहेत. उदा - प्रेयसीने तिचा प्रेमभाव पहाटेच्या दवाने तृणाच्या कानात हलकेच सांगावा तसा सांगितला किंवा पानाआड दडून फुलणाऱ्या फुलासारखाच तो फुलला.

सौंदर्याच्या जोडीला वत्सलता, माया, शांती, श्रमप्रतिष्ठा, करुणा, मृत्युंजयता, मांगल्य या सर्वांची गरज असल्याचे पाडगांवकर सांगतात.

पाडगांवकर वासनेकडे अलौकिक दृष्टीने पाहतात. वासनेत निसर्गाची सुंदरता त्याना अभिप्रेत आहे. जग वासनेतच जगते. निसर्गातही वासना आहे. सृजनाची अद्भूत प्रेरणा म्हणजे वासना तेच सृष्टीतील हिरवे चैतन्य होय. अशी कवींची श्रध्दा आहे. नवनिर्मितीचा, सृजनशीलतेचा उद्घोष पाडगांवकर या वासनाप्रेमातून करतात. कारण जगण्यातला खरा आनंद नवनिर्मितीत, सृजनात आहे. म्हणूनच वासनेला डोळे मिचकावणे म्हणजे भेकडपणा होय असे कवी सांगतात.

प्रेयसीरुपी साथीदाराकडील निर्मळ मार्दवच कवीला हवे आहे. त्यात प्रमत्त यौवन दडलेले असेल. शुभ्र प्रकाश देणाऱ्या चांदणीप्रमाणे तिने आपले लाघव मार्दव देत रहावे अशी अपेक्षा पाडगांवकरांचा प्रियकर व्यक्त करतो. यंत्राप्रमाणे रुक्ष झालेल्या जीवनात तिने मंत्रासारखे यावे. नवनवीन रुपे घेत यावे. पहाटेच येणार असेल तर धुके होऊन किंवा हिरव्या तृणावरुन अलगद निथळणाऱ्या दवाप्रमाणे यावे आणि आपल्या प्रियकराशी एकरुप व्हावे. तिच्या डोळ्यात खोलवर बुडताना त्याला स्वत:चे परकेपण जाणवते. शिशिरातल्या गूढ पहाटे समुद्र धुक्यात बुडून जावा तसे ते क्षण होते अशी प्रांजल कबुली प्रियकर देता. कवीच्या भाववृत्तीचे विविध पदर सुंदरपणे अभिव्यक्त होताना दिसतात.

कांही प्रेमकविता विरहाची व्याकुळता व्यक्त करतात. त्यात प्रेयसीचे व्याकुळ मन, प्रियकराची प्रेयसीच्या भेटीसाठी होणारी तगमग, प्रेयसीच्या मनाची घालमेल, हुरहूर आली आहे. तिच्या प्रेमाची निकड प्रियकराला तीव्रपणे जाणवते. 'तू असतीस तर झाले असते गडे उन्हाचे गोड चांदणे' असे तो सांगतो.

पाडगांवकरांच्या प्रेमकवितेतील भावसौंदर्य त्याच्या कोमलतेला, सजीवतेला धक्का न लागता व्यक्त होते.

पाडगांवकरानी प्रीतीचे भाव दर्शन अतिशय समर्पक निसर्ग प्रतिमा वापरुन घडविले आहे. या निसर्गप्रतिमांचे आवरण इतके पारदर्शक आहे की कवितेचे मूळ नितळरुप झाकले जात नाही. 'गंधातून गूढ उकलते' या कवितेत तिने न बोलतासुध्दा त्याला तिच्या सर्व भावभावना समजतात हे सुंदरपणे सांगितले आहे.

यंत्राप्रमाणे रुक्ष झालेल्या जीवनात तिने मंत्रासारखे यावे. त्यामुळे जीवन अखंड नूतन होईल असे त्याला वाटते. जलधारातून भिजत ये असे तिला सांगून दोघांचे मीलन 'जमीन काळी, मातला अंधार घट्ट कवळी' अशा निसर्ग दृश्यातून कवी व्यक्त करतात. 'दोघांच्या छाया एकरुप आपुल्या' या प्रतिमेतून दोघांचे मनोमीलन सूचकपणे व्यक्त होते. तिच्यावरचे प्रेम व्यक्त करण्यासाठी अनेकदा शब्द ओठावर आले पण नकळत त्यांचे दवाचे थेंब झाले व हळुच पाकळ्यावर पसरले.

प्रेयसीचे एकाकी, उदास, विरहाने व्याकूळ झालेले मन कवीने शिशिरातल्या उत्तररात्री झुकणारे आकाश, उदास वारा, दवांची कोवळी फुले ढाळणे अशा निसर्गाच्या शब्दचित्रातून दाखविले आहे.

तिच्या आठवणींच्या ज्वाळा एकाकी दुपार जाळू लागतात. आसवात भिजलेली ही कथा तिला सांगायचे राहून जाते. भाव फुलांचा गंध तुझ्याभोवतीच घोटाळत असतो. तेव्हा तू जर भोवती पाहिलेस तर निर्माल्याची रास पडलेली दिसेल असे प्रियकर सांगतो. त्यांचा प्रियकर शरीर मीलनापेक्षा मनोमीलनास अधिक उत्सुक आहे. कधी कधी त्यात ही तो समाधानी आहे.

'पांघरुण' या कवितेत हळव्या पण स्वाभिमानी प्रेयसीचा अनुभव शब्दांकित झाला आहे. एका रात्री त्याची वासना तिला आंधळी रानटी वाटते. ती त्याला झिडकारते. पण पहाटे जाग आल्यावर त्याच्या निस्सीम प्रेमाची ओळख पटते. तिच्या मनाचे अडसर गळून पडतात. 'अलगूज' कवितेतील प्रेयसीसुध्दा अशीच अडसर बंध नसलेल्या मुक्त जीवनाचा आनंद लुटण्यास उत्सुक आहे.

प्रियकराने आपले मोठेपण विसरुन धुक्यातून मला शोधत दवबिंदू होऊन यावे. इतकेच नाही तर त्याने हसत सहज फुलवावे आणि मी नकळत फुलावे. तू तुलाच विसरुन यावे

आणि मी तुझ्यात मज विसरावे असे ती सांगते. विवाह बंधनात इतकी आत्यंतिक एकरुपता तिला हवीशी वाटते.

अर्थात प्रियकर व प्रेयसी दोघांनाही आपले स्वत्व जपण्याची इच्छा आहे. ती त्याचे स्वप्न असली तरी स्वप्नाचे दान देऊन माझी जाग मागू नको असे तो स्पष्ट बजावतो. तू मागशील ते मी जरुर देईन तरीही माझे पंख तू मागू नको असे ही तो सांगतो.

पाडगांवकरांनी रंगविलेली ही प्रीती समंजस आणि डोळस आहे. तेजाकडे प्रकाशाकडे झेपावतांना निसर्गाशी जवळीक साधतांना त्याची गरज आहे. लौकिक भावजीवना इतकेच कलात्मक जीवनही प्रत्येक व्यक्तीला आवश्यक आणि हेवेसे वाटणारे आहे. सप्तसुरांची वीणा मधुर आवाज करते. त्यात तारांची एकरुपता झालेली असते हे जरी खरे असले तरी त्यासाठी दोन तारामध्ये अंतर असणेसुध्दा तितकेच आवश्यक असते. तेव्हा जवळपणाचे बंधन न होण्यासाठी दक्ष रहावे असे पाडगांवकर सुचवितात.

प्रेम ही एक उत्कट आणि उत्स्फूर्त अशी भावना आहे. प्रेम माणसाला धीट बनविते. आत्मिक बळ देते. आत्मविश्वासाने परस्परांच्या साथीने जीवन आनंदमय आणि सुखकर करण्यास मदत करते. शारीरी मीलनाशिवाय प्रेम असू शकत नाही. त्यांत गैर कांहीच नाही. पार्थिवता महत्वाची आहेच. नवनिर्मिती, सृजनता ही सर्व अशा प्रेमातूनच येते हे ही लक्षात घ्यावे. असे पाडगांवकरांच्या विविध प्रेमकवितातून अभिव्यक्त झालेले आहे.

## - संदर्भ -


१) जिप्सी - प्रस्तावना - बा.ल. कुलकर्णी पृ.क्र. १०

२) जिप्सी - तुझी निराळीच तऱ्हा पृ.क्र. ३४

३) जिप्सी - आज पृ.क्र. ७

४) जिप्सी - सुंदर आहे माझी वासना पृ.क्र. ९३

५) जिप्सी - हात हवे मज पृ.क्र. २४

६) जिप्सी - क्षणात असल्या पृ.क्र. ३६

७) जिप्सी - गंधातुन गुढ उकलते पृ.क्र. ५

८) जिप्सी - चिरनूतन पृ.क्र. ९

९) जिप्सी - जर पहाटेच येणार तरी पृ.क्र. ११

१०) जिप्सी - रात्र भिजली पृ.क्र. ५७

११) जिप्सी - तुज आठवते का? पृ.क्र. ९८

१२) जिप्सी - गहन तुझ्या डोळ्यात पृ.क्र. १००

१३) जिप्सी - निवांत पृ.क्र. ५६

१४) जिप्सी - शिशिरामधल्या उत्तररात्री पृ.क्र. १४

१५) जिप्सी - गंधातुन गूढ उकलते पृ.क्र. ६

१६) जिप्सी - तू असतिस तर पृ.क्र. ३३

१७) जिप्सी - व्यथा पृ.क्र. ४१

१८) जिप्सी - अशा वेळी पृ.क्र. ७५

१९) जिप्सी - दुपार एकटी जळे पृ.क्र. ८०

२०) जिप्सी - प्रतीक्षा पृ.क्र. १०५

२१) जिप्सी - काळी कड सावलीची पृ.क्र. ११३

२२) जिप्सी - धुक्याचा हा पूल पृ.क्र. १०८

२३) जिप्सी - विस्मरणाचे दान तुझे ते पृ.क्र. ३१

२४) जिप्सी - पांघरुण पृ.क्र. ५४/५५

२५) जिप्सी - अलगुज पृ.क्र. ७३

२६) जिप्सी - अलगुज पृ.क्र. ७१

२७) जिप्सी - मी फूल तृणातिल इवले पृ.क्र. १७

२८) जिप्सी - मी फूल तृणातिल इवले पृ.क्र. १८

२९) जिप्सी - माझे पंख मागू नको पृ.क्र. ६५

३०) जिप्सी - जवळपणाचे झाले बंधन पृ.क्र. ७६

३१) जिप्सी - जवळपणाचे झाले बंधन पृ.क्र. ७७

३२) जिप्सी - मी चंचल होऊनि आल्ये पृ.क्र. २१

३३) जिप्सी - मज नव्हते ठाऊक पृ.क्र. ८८-८९